# भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनाली स्त्री चित्रण

शोधपत्र-मराठी साहित्य

* प्रा. डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी

प्राचीन काळापासून भटकत राहणारा भटका समाज भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही अस्थिततेचे जीवन जगत आहे. प्रथम 'भूमीपुत्र' म्हणून घोषित केलेला हा समाज एक वेळच्या जेवणाला मोताज झालेला आहे. जनावरांची गावातील ग्रामपंचायतीमध्ये नोंद असते. त्यांना आपल्या जगण्याचा दाखला मिळतो, परंतु भटक्या समाजाला सांगायला गाव नसल्याने व नावाची गावात नोंद नसल्याने जनावरापेक्षाही हीनतेचे जीवन जगावे लागते. शासनकर्त्यालाही यांच्याविषयी कधी किव वाटली नाही. विकासाच्या नावावर करोडो रूपये खर्च करणारे सरकार बटक्या समाजाच्या पोटाचा विचार करायला तयार नाही. म्हणूनच लोकशाही प्रणालीतील हा समाज उपेक्षितपणाचे उपरे जीवन जगत आहे. प्रत्येक जाती-जमातीत विभागलेला हा भटका समाज हवेत राख उधळावी आणि हवेतच विलीन व्हावे त्याप्रमाणे तो विस्कटलेल्या अवस्थेत पहावयास मिळतो. संघटनेचा अभाव असलेला हा समाज जीवनभर दारूत दंग होवून तंगपणाचे जीवन जगत श्रद्धेपेक्षा अंधश्रद्धेला अधिक मानतो, याचे चित्रण भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनात पहावयास मिळते. भटक्या स्त्रीच्या जीवनाची ससेहोलपट तर यापेक्षा कितीतरी पटीने वेगळी आहे. भटकी स्त्री जीवन जगताना वाट्याला आलेल्या दुःखाची गाथा कुठेही न मांडता नशीबाला दोष देत ती मूकपणाने जीवन जगते.

भटक्या-विमुक्तांच्या दुःखात संघर्षात व जीवनात येणा-या प्रत्येक संकटाच्यावेळी साथ देणारी भटकी स्त्री ही भटक्यांना सावली समान सतत सोबत राहून जीवनाला जगवणारी व जगणारी आहे. 'उपरा' मधून येणारी लेखकाची आई आनवरी स्वतः उपाशी राहते परंतु आपल्या पिलांच्या क्षुब्ध भुकेला क्षमविण्यासाठी ती पाण्याविना राहणा-या माश्याप्रमाणे तडफडते. तिला आपल्या मुलाबद्दल असणारे वात्सल्य, कौतुकही आहे. लेखकाला शाळेत घालते परंतु शाळा सुटली तरी लेखक शाळेतून कसा येत नाही म्हणून त्याची वाट पाहणारी आनवरी हळव्या स्वभावाची आहे. नव-याचा वेळप्रसंगी मार खावुन नव-याबरोबर कष्टमयतेचे काम करत मुलांच्या भावी काळासाठी ती आशावादी दृष्टीकोन ठेवत आयुष्य काटते. आयुष्यातील जगण्याला काडीचाही अर्थ नसलेल्या या स्त्रिया श्रद्धाळू व मायाळू आहेत. कैकाडी समाजात आपला जन्म झाल्याने आपण चांगले राहणे, चांगले दिसणे अनुचित मानते. कारण घाणीच्या साम्राज्यात जन्म झालेल्या व वावरणा-या स्त्रीने गलिच्छच रहावे असे तत्वज्ञान आनवरी नुसते सांगत नाही तर त्याचे पालन ती स्वतः करते म्हणूनच की काय लेखक शिक्षण घेऊन मोठा झाल्यावर आई-वडिलांना न विचारता आंतरजातीय विवाह करतो तेव्हा आनवरी आपल्या मुलाच्या घरी पाणी न पिता रात्रीच्या वेळी कैकाडी वाड्यात झोपण्यास जाते. कमालीच्या दारिद्र्यात नांदत असलेल्या आनवरीला लेखकाच्या पुरोगामी विचाराचा जणू ती एका अर्थाने निषेधच नोंदवताना दिसते. तिचा हा निषेध समाज आपल्याला वाळीत टाकील या भीतीपोटीचा आहे, म्हणूनच ती आपल्या मुलाला म्हणते, "आमचं वाटुळं केलंस, रं बाबा ! आरं, तुला पैदा करण्याऐवजी दगडधोंड्याला काढला आसता तर बरं झालं असतं रं"[१] आनवरी सोशिक व मर्यादा ठेवणारी असली तरी ती कैकाडी समाजातील परंपरा, चालीरिती व समाजनियम पाळणारी आहे.

या देशात जन्माला येवूनही या देशातच वंचित ठरणा-या या देशातील भटक्या-विमुक्तांच्या स्त्रियांचे जीवन दाहक आहे. दादासाहेब मोरे यांनी 'गबाळ' या आत्मकथनात त्यांच्या जडणघडणीमध्ये ज्यांचे योगदान आहे त्यात स्त्रियांचे स्थान महत्वपुर्णतेने समजली जाते. 'गबाळ' यातून येणारी मानकाआई लेखकाची आजी असून तो तिला आई मानतो. अकाली वैधव्य प्राप्त झालेल्या मानकाआईला दोन मुलीच होत्या. मुलगा नसल्याची खंत कधीही न दाखवता ती आपल्या नातालाच मुलगा मानते. यल्लाप्पा या आपल्या पतीला आजाराच्या काळात चुकीचे औषध घेतल्याने पतीचा मृत्यु झाला. त्यावर ती दुःखाची गाथा कुणापुढेही न मांडता ती स्वतःच कष्ट करत आपल्या जीवनाला पुर्णत्व करण्याचा प्रयत्न करते. स्वतः शिक्षणाचा गंध नसताना ती आपल्या अनुसया नावाच्या मुलीचा मुलगा दादासाहेबाला गावातील शाळेत शिक्षण शिकवते. उदरनिर्वाहासाठी कायमचे साधन नसतानाही ती सुया, दोरा, बिबे, कुंकू, फण्या, दातवण विकून नाताला शिकवते. आपले आयुष्य खडतर जगण्यात गेलेले असले तरी येणारी पिढी तरी चांगल्या जीवनाने जगावी आणि जगण्यासाठी शिक्षण हे त्यावरील रामबाण तरणोपाय आहे, असा नवा आदर्शवाद शिकवणारी मानकाआई स्वभावाने मायाळू व श्रद्धाळू आहे. तशीच ती आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवत जगण्यातील वास्तवपणा प्रखरतेने स्पष्ट करणारी आहे. लेखकाला शाळेत नाव घालताना हेडमास्तरला म्हणते, "गुरूजी ह्यो माज्या लेकीचा पोरगा हाय,

* मराठी विभाग, भाई किशनराव देशमुख महाविद्यालय चाकूर जि. लातूर ( महाराष्ट्र )

दादासाब त्येचं आयबाप मागून खात्याती, बावचीत त्येच्या आजीजवळ ऱ्हावून पाच बुकं शिकलाय, आजीनं ठिवून घेतलं न्हाय म्हणून त्येच्या बानं सालंतनं काडलं व्हतं, म्या हाकडं आणलया, साळा शिकवाला. तवा ह्येच नाव लिवून घ्या."[२] इ.स. १९७३-७४ च्या दुष्काळात सबंध समाज जसा होरपळला गेला होता त्यात मानकाआईही अपवाद राहात नाही. तिने करत असलेला व्यापार कोसळला जातो. त्यात ती न डगमगता शासनाने काढलेल्या रस्त्याच्या कामावर मजूर म्हणून जाते. मानकाआई येणा-या प्रत्येक संकटाला तोंड देत खंबीरपणाने उभी राहात दादासाहेबांच्या जीवनाला नवे आयाम देण्याचा प्रयत्न ती साकल्याने करते. हेच तिचे मोठेपण लेखकाच्या हृदयावर कोरले जाते.

'आयरनीच्या घना' मध्ये लेखक वैजनाथ कळसे शिक्षण शिकत असताना जिवाचं रान करून साथ देणारी लेखकाची पत्नी नागीन महत्वपूर्ण आहे. उदगीर तालुक्यातील हाळी या खेडेगावात दहावीत शिक्षण घेणारी अशिक्षीत घरातील मुलगी आहे. म्हणूनच लेखक नागिनसोबत नोंदणी पद्धतीच्या लग्नाला ती होकार देते. लग्नात होणा-या खर्चात लेखक पुण्यासारख्या ठिकाणी एम.ए. चे शिक्षण घेण्याचे ठरवितो तेंव्हा त्यास नागिन विनाअट सहमती दर्शविते. तिने घेतलेल्या शिक्षणाची व नव-याच्या ध्येयाला ती अधिक परिपक्व करत पाठबळ देवून परिवर्तन विचाराचा मार्ग स्वीकारते. लेखकाला परीक्षा शुल्क भरण्यासाठी पैसे नसतात तेंव्हा ती आपल्या गळ्यातील मंगळसुत्र लेखकाला विकण्यासाठी देते. गळ्याची मंगळसुत्रापेक्षा पतीवर आलेल्या संकटाला परतवून लावण्यात ती अधिक पवित्रता मानते. हाळीला आल्यानंतर ओटी-पोटीची असतानाही ती खुरपणीचे अवघड काम करते. लेखकाच्या प्रत्येक आडी-अडचणीला साथ देणारी नागिन स्वभावाने हळवी, संयमी व कष्टाळू आहे. आपले दुःख इतरांपुढे मांडून दुःखाला दुःख जोडीत बसण्यापेक्षा दुःखातून स्वतः मार्ग काढत त्यात सुखाचा अढा शोधणारी नागिन निश्चितच परिवर्तन व आशावादी दृष्टीकोणाची आहे.

भटक्या-विमुक्तांच्या जाती-जमातीतील गुन्हेगार जमात म्हणून ओळखल्या जाणा-या व जन्मतःच गुन्हेगारीचा शिक्का मारलेल्या 'बेरड' समाजाचे चित्रण भीमराव गस्ती यांनी 'बेरड' या आत्मकथनात केलेली आहे. गुन्हेगार म्हणून चटणीसारखे कुटल्या जाणा-या या समाजातील स्त्रियांचे दुःख कवेत न मावणारे आहे. अजन्म द-या खो-यात डोंगरमाथ्यावर राहणा-या या समाजाला गावाचा लवलेश न येता सतत निसर्गाच्या कुशीत राहून येणा-या नैसर्गिक आपत्तीला तोंड देत समाजाकडून होणा-या अन्याय, अत्याचार व पोलिसी खाकीचा मार सहन करतच आयुष्य संपवणे हेच त्यांच्या जीवनाची कमाई व सार्थकता समजली जाते. याचे यथोचित वास्तविक स्त्री चित्रण भीमराव गस्ती यांनी या आत्मकथनात केलेले आहे. बेरड समाजातील स्त्रियांनी शिक्षण घेणे हे समाजाला अमान्य आहे. म्हणूनच या समाजातील स्त्रिया अज्ञान, अशिक्षित व अंधश्रद्धेच्या खोल गर्तेत रुतलेल्या आहेत. लेखकाच्या मामाला मूल होत नाही म्हणून पहिले मूल सौदंत्तीच्या यल्लमाला वाहिल असा नवस बोलतात. तो नवस फेडण्यासाठी लेखकाचे मामा आपली थोरली मुलगी सत्यव्वाला वाहातात. तिचे लग्न करता येत नाही, म्हणून नात्यातला सालगडी म्हणून ठेवलेल्या पुरूषाबरोबर सत्यव्वाची 'उकडी' करून दिली जाते. सत्यव्वाला घरात बसून काय करावे म्हणून ती आपले जीवन जगण्यासाठी दारू विकण्याचा व्यवसाय करत आपला उदरनिर्वाह भागविण्याचा प्रयत्न करते. हा व्यवसाय करीत असताना तिला अनेक कटू प्रसंगाला तोंड देत ती जीवन जगते. एका माणसाने तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला तेंव्हा सत्यव्वा आपल्या प्रामाणिकतेला व निष्ठतेला तडा न जावू देता स्वतःच्या संरक्षणासाठी हातात विळा घेऊन शूरपणाने म्हणते, "जोगतीण झाली म्हणून मी काय तुझी रांड होवू व्हय? आत पाय टाकलास तर पोटातला कोथळाच बाहेर काढतो बघ! मास काय समजलात तू ? बेरडाची औलाद हाय मी!"[३] या समाजातील स्त्रिया आपला स्वाभिमान न ढळू देता बेडरपणाने जीवन जगतात हेच त्यांच्या जीवनाचे वेगळे वैशिष्ट्य मानावे लागेल.

हाजारो वर्ष पशुतुल्य जीवन जगणा-या 'पाथरूट' समाजाचे चित्रण लक्ष्मण गायकवाड यांनी 'उचल्या' या आत्मकथनात केलेले आहे. लक्ष्मण गायकवाड यांनी सामाजीक जीवनाचा वास्तविक वेध घेत पाथरूट समाजातील स्त्रियांची जीवनपद्धत, दुःख, अन्याय, यातना, शोषण व अत्याचार याचा विस्तीर्णपट ही समाजासमोर मांडून २१ व्या शतकात स्त्रियांची होणारी ससेहोलपट शब्दाच्या माध्यमातून साकारलेली आहे. लेखकाच्या बायकोची मावस बहिण चांगुणा आठ-आठ लोकांना जगवते. ती तीन नवरे करते. बहुपत्नीत्वाबरोबरच बहुपत्नीत्व या समाजात पाहण्यास मिळते ती दोन छटाक सोने चोरते परंतु तिला पकडण्याची कोणाचीच हिंमत होत नाही. लोकांना दाबून बोलणारी चांगुणा निर्भिडवृत्तीची तर आहेच पण ती अर्धा किलो मटण, पाच लिटर सिंधी, नऊ कप चहा व पंचवीस पाव एवढा आहार ती पचवते. अंगाने स्थूल झालेली चांगुणा काहीच काम न करता घरातील कामासाठी नोकर ठेवते. अधिक कमाई झाल्यास ती तुळजापूरच्या आईची पूजा करून बोकड कापून सर्वांना जेवण देते. कवठ्याच्या आईचा गोंधळ ठेवला तेंव्हा ती पाच गाडगे सिंधी पिते. अंगात आल्याने ती झुलू लागते तेंव्हा तिला चक्कर येते अन् धाडकन ती खाली कोसळते, त्यातच तिचा मृत्यु होतो. चिंगुच्याच वयाची असलेली रती एका वेगळ्या स्त्री चित्रणातून पहावयास मिळते. ती तीन जणासोबत लग्न करूनही चौथ्यावेळी मुसलमानासोबत लग्न करते. चो-या करण्यात प्रविण असलेली

रती जेवायला व तिकिटाला पैसे नाहीत म्हणून जन्म दिलेल्या दीड वर्षाच्या सुंदर ईटी नावाच्या मुलीला पुण्यात दोनशे रूपयाला पुण्यात विकले जाते. ही ईटी आजही जिवंत आहे. स्वातंत्र्यानंतरही आणि महासत्ता बनू इच्छिणा-या या भारत देशात पोटचे मूल विकून जीवन जगावे लागते ही या देशाची उन्नती की अवनती? या प्रश्नाचे उत्तर न देणे हेच इष्ट मानावे लागते.

इ.स. १९८९ साली प्रकाशित झालेल्या आत्माराम कनीराम राठोड यांच्या 'ताण्डा' या आत्मकथनात बंजारा समाजजीवनाच्या चित्रणाबरोबरच बंजारा स्त्रीचेही चित्रण आलेले आहे. लेखकाची चुलती चपली काकू घरात मोठी असुनही लेखकाच्या वडिलांना भीते. चपली काकू दम्याच्या आजाराने त्रस्त असते. तरीही ती चोरून दारू पिते. स्वतः दारू पित ती लेखकालाही दारू पाजवायची. म्हणायची, "दिना, गिळवत नाही रे लेका एकटीला तुला सोडून घेतू चार घोट. पण बहकू नकोस हां, आणि तुझ्या बा जवळ नाही जायचे आज"[४] लेखक दारू पिवून काकूच्या कुशीत झोपतो. दम्याच्या आजाराने त्रस्त झालेल्या काकूला कोड ही फुटलेले असते. काकू आजाराला कंटाळून तांड्यासमोरच्या पाण्याने काठोकाठ भरलेल्या विहिरीत उडी टाकून आत्महत्या करते. आत्महत्याचे प्रकरण म्हणून काकूच्या मृतदेह अंत्यविधीसाठी लवकर देत नाहीत. चीफसाहेब (पोलीस) चा चेहेरा तांडावासीयांच्या लक्षात येतो अन चिफसाहेब मृतदेहाच्या मोबदल्यात शंभराच्या नोटा आणि चिकणचं जेवण मागतो. चिफसाहेबाच्या या मागणीपुढे सर्व तांडावासीय हतबल होतात आणि चिफसाहेबाला चिकणचं जेवण देऊन मृतदेह ताब्यात घेतात. घरात मृतदेह असताना कोंबडा शिजरा आणि तोही श्रावण महिन्यात याचे दुःख तांड्यावरील बायकांना होते. काकूच्या मृत्युचे दुःख गिळून नविन दुःखाची एक वेगळा नजराणा तांडावासीयांना पहावयास मिळतो.

'मरणकळा' या आत्मकथनातील स्त्री विश्व पाहिले तर ते अत्यंत विदारक आहे. या आत्मकथनातील लेखिका सौ. जनाबाई गि-हे यांनी केवळ समाजाचे चित्रण केलेले नाही तर आपल्या वाट्याला आलेल्या दाहक जीवनाच्या विस्तीर्णपट हुबेहुब पणाने उभा केलेला आहे. जीवनात जे अनुभव आले ते अनुभवाला आकार देत जीवन सफल करण्याचा प्रयत्न यांनी यात केलेला आहे. जनाबाई गि-हे ह्या आई-वडिलांना एकट्याच आहेत. वडिलांची इच्छा मुलीला शिकविण्याची असते. पण गोपाळ समाजात स्त्री शिकणे म्हणजे पाप व शिंधळकी केल्याप्रमाणे असते म्हणून समाज जनाबाईच्या शिक्षणाला विरोध करतो. एवढेच नाही तर त्यावर जातपंचायत बसून जनाबाईच्या आई-वडिलांना जातीबाहेर टाकले जाते. एकीकडे दारिद्र्याने पिछाडलेल्या बापूला क्षुब्ध भूकेला क्षमविण्यासाठी भीक मागून जगतो. परंतु आपल्या मुलाच्या शिक्षणाला विराम देत नाही. जनाच्या शिक्षणाला जसा समाज हा अडथळा ठरतो तसाच तिला होणा-या आजारानेही ती त्रस्त झालेली असते. त्यातच तिचे वडील आजारी पडतात तेंव्हा तर तिच्या जीवनात अनेक वाईट प्रसंग येऊ लागतात. वडिल आजारी पडल्याने तिला आई सोबत मोल मजुरी करावी लागते. त्यामुळे तिची शाळा बुडते. त्यामुळे ती अधिकच दुःखी होते. नगरच्या महाराष्ट्र डी.एड्. कॉलेजला नंबर लागूनही पैसे नसल्याने तिच्यापुढे एक मोठे संकट उभे राहते. व्याजाने पैसे काढून वसतिगृहात राहते. कॉलेजच्या पहिल्या दिवशी अंगावर घातलेली मळकी साडी असल्याने हजेरी देत नाही. आपली गरिबीही अशा लाज-या व चोरट्या वृत्तीतून झाकण्याचा ती प्रयत्न करते. परंतु ही लाज ती जास्त दिवस न पाळता आपल्या समोरच्या ध्येयाला ती जगण्याचा प्रयत्न करते. अशा मरणमय स्त्री यातना जनाबाई गि-हे यांनी आपल्या आयुष्यात भोगल्या त्याच त्यांनी 'मरणकळा' या आत्मकथनात चित्रीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'कोल्हाट्याचं पोर' या किशोर शांताबाई काळे यांच्या आत्मकथनातून येणारी सुशीला लेखकाची मावशी देखनी व सरळ स्वभावाची आहे. ती सतत डोक्यावरचा पदर कधीही न खाली पडू देत नाही. लक्ष्मीसारखी दिसणारी सुशीला ब्राह्मणाच्या मुलीसारखी शालीन बोलते. सेलूचे सोपानराव गोळेगावकर यांना सुशीला आवडल्याने ते तिची मागणी करतात. चाळीस वर्षाचे गोळेगावकर कमी वय असलेल्या सुशीलाच्या चिरा उतरवतात. त्यांच्यापासून सुशीलाला मुलगीही होते. सोपानराव पैसे देत नाही म्हणून कोंडीबा सुशीला व गोळेगावकर यांची ताटातूट करतो. या समाजातील स्त्रियांची इच्छा असो, नसो कुटुंबातील पुरूषांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना ऐकावे लागते. सुशीला नंतर रमेश पाटील यांच्याशी संबंध ठेवून आपल्या वडिलांचा व भावाचा संसार उभा करून त्यांना सुखाने, मौजेने जगते. कोल्हाटी समाजातील स्त्रिया नावाने वेगळ्या असल्या तरी दुःखाने व वेदनापटाने त्या एकच आहेत. पुरूषासाठी नाचणा-या या स्त्रियाजवळ रडण्याशिवाय काहीच उरत नाही. जन्माला घातलेल्या मुलांना सांभाळणे व त्यांना मोठे करणे हीच त्यांची संपत्ती बनते. सुशीला मुलीला फिस भरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून ती इंदापूरच्या लॉजवर दोन हजार रूपयासाठी`क रात्र ती आपले शरीर विकते. लेखकाच्या समोर हे कृत्य केल्याचे लेखकालाही ते अनैतिक वाटते. परंतु सुशीलाच्या समोर नाविलाज असतो. हे जीवन सुशीलाला नकोसे वाटते म्हणून स्थैर्याचे जीवन जगू इच्छिते, म्हणूनच ती कोल्हापूरच्या चाळीस वर्षाचे गुरूजी सुशीलाच्या शरीरावर प्रेम न करता तिच्या स्वभावावर करतात. त्यांच्याजवळच सुशीला आपल्या तीन मुलांना घेऊन आपले भावी स्वप्न पुर्ण करण्याचा प्रयत्न करते.

'दगडफोड्या' या आत्मकथनात रामचंद्र नलावडे यांनी 'वडार' समाजातील एक वेगळे स्त्री विश्व साकारलेले आहे. धर्मा वडाराची बायको हिरी कागल या गावची असते. हिरी

घरात पीठ नसल्यामुळे चंद्र्याच्या घरी जाते. चंद्र्याची बायको नदीवर धुणे धुण्यासाठी जाते. त्यामुळे ती घरात नसल्याने चंद्र्या व हिरी हे दोघे घरात कडी लावून बसतात. चंद्र्याची बायको काशी नदीवरून धुणे धुऊन घरी येते ती दाराच्या फटीतून पाहते तेंव्हा मोठ-मोठ्याने ओरडते व सर्व वडरांना जमवते. काशी चंद्र्याला शिव्या देत मुलांना सोबत घेऊन कोल्हापूरला निघून जाते. धर्मा त्याच दिवशी थोडाही विचार न करता हिरीचे नाक अन स्तन कापतो व तिला बजावतो, "हिरे आजपास्न तु माझी बायको नव्हस अन् मी तुझा नवरा न्हाय. लेकरास्नी ठेवून कुठंबी हेपलत जा. माझ्या घरात -हाईलीस तर कु-हाडीने दोन तुकडे करीन. रांड अब्रु घालविलीस माझी समदी. तुझं त्वॉंड दिकून बगायची माझी विच्छा नाय"[5] हिरी नव-या समोर माफी करा म्हणून टाहो फोडते परंतु धर्मा तिच्यावर जात पंचायत बसवतो. हिरीने शिंधळकी केली म्हणून तिला संसार करण्याचा अधिकार नाही. तिने मुले सोडून येल्लुबाईच्या नावाने जोगवा मागून आपला उदरनिर्वाह भागवावा. असा निर्णय जातपंचायत देते. चंद्र्या पुरूष असल्याने जातपंचायत त्याला सहिसलामत सोडते. त्याने काशी सोबत संसार करावा परंतु गुन्हा केलेल्या एकट्या हिरीलाच गुन्ह्याचे प्रायश्चित्त भोगावे लागते. आधीच शिक्षा भोगलेल्या हिरीला लग्न करण्याची परवानगी मिळत नाही. वडार समाजात अशा कित्येक स्त्रिया या पद्धतीचे जीवन जगत आहेत. हिरी ही या आत्मकथनात एक अभागी स्त्री म्हणून पहावयास मिळते.

**समारोप :-** भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनातील स्त्री व्यक्तीरेखांच्या जाणिवा या निश्चितच वेगळ्या आहेत. भटकी स्त्री सतत भटकंती करत असल्याने ती बकालपणाचे जीवन तर जगतेच परंतु वाट्याला आलेल्या जीवघेण्या प्रसंगात ती आपले आयुष्य संपविते. निसर्गतः लाभलेले सुंदर रूप भटक्या स्त्रियांना समाजव्यवस्थेची कुरूप/विद्रुप नजर पडल्याने ते सौंदर्य त्यांच्यासाठी वरदान न ठरता शाप ठरते. देवाची बायको बनून देवदासी बनणारी या समाजातील स्त्री आयुष्यभर प्रामाणिक जीवन जगते. परंतु तिच्या परिस्थितीचा फायदा घेत तिच्यावर अतिप्रसंग करणा-या पुरूषाला धडा शिकवत चारित्र्याला तडा जाऊ देत नाही. अंधश्रद्धेच्या खोल गर्तेत बुडालेली भटकी स्त्री शिक्षणाच्या अभावाने वाया गेलेली आहे. या समाजातील जातपंचायतीने कित्येक स्त्रिया या बळी ठरलेल्या आहेत. भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनात स्त्रियांच्या जीवनाची फरफट, मानसिक ताण-तणाव व अस्तित्वहीन जगणे चित्रीत होते.

## सन्दर्भ ग्रन्थ


१) उपरा, माने लक्ष्मण, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती, २०००, पृष्ठ १३२.

२) गबाळ, मोरे दादासाहेब, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८३, पृष्ठ ९७.

३) बेरड, गस्ती भीमराव, राजहंस प्रकाशन, पुणे, ऑगस्ट २००२, पृष्ठ १३६.

४) ताण्डा, राठोड आत्माराम, राजदूत प्रकाशन, यवतमाळ, २००२, पृष्ठ २३.

५) दगडफोड्या, नलावडे रामचंद्र, देशमुख आणि कंपनी, पुणे, २०००, पृष्ठ ८९.